राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या रुग्णालयांतील शस्त्रक्रिया गृहामध्ये निर्जंतुकीकरण करण्याकरीता **Fumigation Product (25 Gram Sachet)** खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२२५/प्र.क्र.१२४/खरेदी कक्ष

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २२ डिसेंबर, २०२५.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
३) शासन पत्र क्र.एसडीएल-२०१९/प्र.क्र.१८१/आरोग्य-८, दि.१८.०३.२०२५
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालय-राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्र.आसेआ/कक्ष-३/टे-३/Fumigation Product/प्र.मा. / ७३८५ /२०२५, दि. ०३/०६/२०२५ .

**प्रस्तावना:-**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या रुग्णालयांतील शस्त्रक्रिया गृहामध्ये निर्जंतुकीकरण करण्याकरीता Fumigation Product ची आवश्यकता असल्याने सदर नाविण्यपूर्ण उत्पादनाचा समावेश राज्य औषधी साहित्य सूची (SCL) मध्ये संदर्भीय दि.१८.०३.२०२५ च्या शासन पत्रान्वये करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई यांनी राज्यातील आरोग्य संस्थांकरीता Fumigation Product खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भीय दिनांक ०३.०६.२०२५ च्या पत्रान्वये सादर केला होता. त्यानुसार सदर Fumigation Product (२५ Gram Sachet) खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असणा-या रुग्णालयांतील शस्त्रक्रिया गृहामध्ये निर्जतुकीकरण करण्याकरीता Fumigation Product (२५ Gram Sachet ) या नाविन्यपुर्ण उत्पादनाचा वापर करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या परिशिष्ट क्र. १ मधील मागणी नुसार एकूण १,७१,५८६ इतके Fumigation Product (२५ Gram Sachet) खरेदी करण्यासाठी एकूण रु.४,०४,९४,२९६/-इतक्या रक्कमेच्या खर्चास खालील अटी शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.:-

निर्जंतुकीकरण पाकीटाचा Fumigation Product (२५ Gram Sachet) खरेदीचा तपशिल

| अ.क्र. | निर्जंतुकीकरण पाकीटाची संख्या (Fumigation Product-२५ Gram Sachet) | प्रति नग दर (रुपये) | जी.एस.टी. १८% | एकूण किंमत प्रति नग | एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | १,७१,५८६ | २००/- | ३६/- | २३६/- | ४,०४,९४,२९६/- |

**<u>अटी व शर्ती</u> :-**

१) आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी सदरहू Fumigation Product ची आवश्यकता व प्रत्यक्षातील मागणी याची काटेकोरपणे शहानिशा /खातरजमा प्रथम करावी. तदनंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करावी.

२) खरेदी करावयाच्या सदरहू Fumigation Product बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार अद्ययावत असल्याची खातरजमा करावी.

३) सदर Fumigation Product बाबींची खरेदी ही महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांचे मार्फत विहीत कार्यपध्दती अनुसरुन करण्यात यावी.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय/राज्य वित्त विभागाने वस्तु खरेदीबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे (Manual for Procurement of Goods, Second Edition, २०२४) तसेच शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ (शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका) मधील नियमानुसार तसेच सदर विभागाच्या दि.२४.०८.२०१७, दि.०८.१२.२०१७, दि.०७.०५.२०२१ व दि.०७.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत प्रक्रिया अवलंबून करण्यात यावी. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

५) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याची खातरजमा करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

७) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

८) सदर Fumigation Product बाबी विनावापर आरोग्य संस्थांमध्ये पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची यांची राहील. तसेच, मंडळाच्या अखत्यारीतील आरोग्य संस्थांना गुणवत्तापूर्वक तसेच विनिर्देशानुसार घटकांची मात्रा असणाऱ्या Fumigation Product बाबीचा पुरवठा होईल यांची संपूर्ण जबाबदारी संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांची राहील.

९) सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई घेण्यात यावी. सदरहू खरेदीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा तपशील मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी शासनास सादर करणे अनिवार्य आहे.

१०) सदर खरेदी प्रक्रिया राबविताना शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या खरेदी प्रक्रिया शुल्काची रक्कम महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण,मुंबई यांना अदा करण्यात यावी.

११) या कामी होणारा खर्च, मागणी क्र.आर-२२१०, (०३) (०२) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत औषधे, औषधी साहित्य, यंत्रसामुग्री व साधनसामग्री खरेदी (कार्यक्रम) लेखाशीर्ष २२१० के ०९७ अंतर्गत ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या/ पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतुन भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१२) उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची सर्वस्वी जबाबदारी, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई व सहसंचालक आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांची राहील.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२५१२२२१८११५०५६१७** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2025.12.22 18:55:14 +05'30'

(चंद्रकांत विभुते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई/पुणे
३) सहसंचालक आरोग्य सेवा (रुग्णालय) राज्यस्तर मुंबई
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वैदयकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई
५) सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
६) सह संचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
७) उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व मंडळ

८) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता),मुंबई
९) महालेखापाल, महाराष्ट्र-२(लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता),नागपूर
१०) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
११) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
१२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय सर्व
१३) जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व
१४) निवडनस्ती (खरेदी कक्ष)

## परिशिष्ट-१

| निर्जंतुकीकरण पाकीटाचा Fumigation Product जिल्हा निहाय तपशिल | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of District | Total OT CS Side | Total Demand CS Side | Total OT DHO Side | DHO Demand Side | Total |
| 1 | ठाणे | 31 | 4347 | 27 | 1230 | 5577 |
| 2 | पालघर | 14 | 1504 | 37 | 450 | 1954 |
| 3 | रायगड | 23 | 4901 | 33 | 795 | 5696 |
| 4 | पूणे | 25 | 500 | 96 | 13890 | 14390 |
| 5 | सोलापूर | 21 | 200 | 82 | 10000 | 10200 |
| 6 | सातारा | 7 | 1000 | 84 | 3000 | 4000 |
| 7 | कोल्हापूर | 27 | 6500 | 80 | 8000 | 14500 |
| 8 | सांगली | 15 | 4500 | 65 | 6500 | 11000 |
| 9 | सिंधुदुर्ग | 14 | 230 | 38 | 3000 | 3230 |
| 10 | रत्नागिरी | 18 | 2500 | 68 | 5000 | 7500 |
| 11 | नाशिक | 37 | 2000 | 112 | 10500 | 12500 |
| 12 | धुळे | 16 | 945 | 36 | 1800 | 2745 |
| 13 | जळगाव | 32 | 1389 | 55 | 2750 | 4139 |
| 14 | अहिल्यानगर | 34 | 1500 | 78 | 3120 | 4620 |
| 15 | नंदूरबार | 15 | 500 | 29 | 2000 | 2500 |
| 16 | छ.संभाजीनगर | 13 | 235 | 46 | 1820 | 2055 |
| 17 | जालना | 12 | 150 | 40 | 1500 | 1650 |
| 18 | परभणी | 18 | 230 | 30 | 3000 | 3230 |
| 19 | हिंगोली | 7 | 200 | 24 | 1000 | 1200 |
| 20 | लातूर | 19 | 2624 | 51 | 2448 | 5072 |
| 21 | बीड | 19 | 1575 | 52 | 2496 | 4071 |
| 22 | धाराशिव | 17 | 5330 | 39 | 2352 | 7682 |
| 23 | नांदेड | 22 | 1375 | 72 | 3456 | 4831 |
| 24 | अकोला | 10 | 2500 | 31 | 1000 | 3500 |
| 25 | अमरावती | 34 | 5000 | 57 | 2000 | 7000 |
| 26 | बुलढाणा | 18 | 700 | 40 | 1000 | 1700 |
| 27 | यवतमाळ | 24 | 500 | 60 | 3000 | 3500 |
| 28 | वाशिम | 12 | 2400 | 28 | 2000 | 4400 |
| 29 | नागपूर | 28 | 1740 | 56 | 3250 | 4990 |
| 30 | स्त्री रुणालय, डागा | 4 | 500 | 0 | 0 | 500 |
| 31 | वर्धा | 19 | 1670 | 23 | 230 | 1900 |
| 32 | भंडारा | 18 | 1640 | 27 | 675 | 2315 |
| 33 | गोंदिया | 11 | 300 | 40 | 1440 | 1740 |
| 34 | चंद्रपूर | 20 | 685 | 60 | 1014 | 1699 |
| 35 | गडचिरोली | 22 | 3500 | 40 | 500 | 4000 |
| **Total** | | **676** | **65370** | **1736** | **106216** | **171586** |